ई. प्रजावाणी दि. 14.10.25

# मारतळा परिसरात अवैधरित्या रेतीची वाहतूक करणाऱ्या वाहनावर कारवाई



वार्ताहर • मारतळा

मौजे मारतळा शिवारात मारतळा ते गोळेगाव जाणारे रोडवर विनापरवाना बेकायदेशीर रित्या शासनाचा महसूल चुकवून पाच ब्रास रेतीची अवैधरित्या चोरटी विक्री करण्यासाठी घेऊन भारतबेंझ कंपनीचा हायवा क्रमांक एमएच ०३ सीपी ६७७७ मधून वाहतूक करत असताना आरोपी चालकासह २५ लाख २५ हजारांचा मुद्देमाल जप्त करून नांदेडच्या स्थानिक गुन्हे शाखेने उस्माननगर पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल केला आहे.

ही कारवाई दि. ११ नोव्हेंबर रोजी करण्यात आली. नांदेडच्या स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि. उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. मौजे मारतळा शिवारात मारतळा ते गोळेगाव जाणारे रोडवर विनापरवाना बेकायदेशीरपणे शासनाचा महसूल चुकवून ५ ब्रास रेतीची अवैधपणे भारतबेंझ कंपनीचा हायवामधून (क्रमांक एम एच ०३. सीपी ६७७७) वाहतूक केली जात होती.

यावेळी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पंचासमक्ष मुद्देमाल जप्त करून आरोपी यास ताब्यात घेतले. पोलीस स्टेशन उस्माननगर यांचे ताब्यात देण्यात आले आहे.